भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# अभ्रक खाणी कामगार कल्याण निधि अधिनियम, १९४६

(१९४६ चा अधिनियम क्रमांक २२)

[१ नोव्हेंबर, १९७७ रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Mica Mines Labour Welfare Fund Act, 1946

(Act No. 22 of 1946)

[*As in force on 1st November, 1977*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

( १९७८ )

किंमत ४० पैसे

183

# अभ्रक खाणी कामगार कल्याण निधि अधिनियम, १९४६

## कलमांचा क्रम

कलमे.


१. संक्षिप्त नाव व विस्तार.

२. उपकर बसवणे व त्याची उगराणी करणे.

३. अभ्रक खाणी कामगार कल्याण निधि.

४. सल्लागार समित्या.

५. अधिकाऱ्यांची नियुक्ती आणि त्यांच्या शक्ती.

६. नियम करण्याची शक्ती.


(शा.म.मु.) एच ४८२७ (१०५५—९-७८)

# अभ्रक खाणी कामगार कल्याण निधि अधिनियम, १९४६
## (१९४६ चा अधिनियम क्रमांक २२)

[ २३ एप्रिल, १९४६ ]

अभ्रक खाणकाम उद्योगामध्ये कामाला असलेल्या कामगारांचे कल्याणप्रवर्धन करणाऱ्या कार्यांची वित्तव्यवस्था करण्याकरता एक निधी स्थापन करण्यासाठी अधिनियम.

ज्याअर्थी, अभ्रक खाणकाम उद्योगामध्ये कामाला असलेल्या कामगारांचे कल्याणप्रवर्धन करणाऱ्या कार्यांची वित्तव्यवस्था करण्याकरिता एक निधी स्थापन करणे समयोचित आहे;

त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :––

**संक्षिप्त नाव व विस्तार.**

१. (१) या अधिनियमास 'अभ्रक खाणी कामगार कल्याण निधि अधिनियम, १९४६' असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार [1][ जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून ] संपूर्ण भारतभर आहे.

**उपकर बसवणे व त्याची उगराणी करणे.**

२. (१) केंद्र शासन याबाबतीत **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकापासून[2] या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ उपकर म्हणून, [3][ या अधिनियमाचा विस्तार असलेल्या राज्यक्षेत्रांमधून ] निर्यात केल्या जाणाऱ्या सर्व अभ्रकावर––मग ते कोणत्याही स्थितीत असो––केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वेळोवेळी निश्चित करील त्याप्रमाणे मूल्यानुसार सव्वासहा टक्क्यांहून अधिक नाही इतक्या दराने सीमाशुल्क बसवले जाईल व त्याची उगराणी केली जाईल :

परंतु, १ एप्रिल, १९४७ या दिवसापर्यंत, याप्रमाणे निश्चित केलेला दर मूल्यानुसार अडीच टक्क्यांहून अधिक असणार नाही.

(२) प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या दिवशी किंवा त्यानंतर सोयीनुसार होईल तितक्या लवकर, त्या महिन्यात वसूल झालेल्या सीमाशुल्काचे उत्पन्न, हे उगराणी आणि वसुली यांसाठी काही खर्च झाला असल्यास तो वजा करून 'अभ्रक खाणी कामगार कल्याण निधि' (यात यापुढे 'निधि' म्हणून निर्देशिलेला) नावाच्या निधीमध्ये जमा करण्यात येईल.

**अभ्रक खाणी कामगार कल्याण निधि.**

३. (१) अभ्रक खाणकाम उद्योगामध्ये कामाला असलेल्या कामगारांचे कल्याणप्रवर्धन करण्यासाठी केंद्र शासनाच्या मते आवश्यक किंवा समयोचित असणाऱ्या कार्यांच्या संबंधात करावा लागणारा खर्च भागवण्यासाठी केंद्र शासन या निधीचा विनियोग करील.

(२) पोटकलम (१) च्या व्यापकतेला बाध न येता, निधीची रक्कम––

(क) अभ्रक खाणकाम उद्योगामध्ये कामाला असलेल्या कामगारांच्या हिताच्या ज्या उपाययोजना––

(एक) सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छता यांची सुधारणा, रोगप्रतिबंध आणि वैद्यकीय सुविधांची तरतूद व सुधारणा,

(दोन) पाण्याचे साठे आणि धुण्याच्या सोयी यांची तरतूद व सुधारणा,

(तीन) शिक्षणविषयक सोयींची तरतूद व सुधारणा,

(चार) घरांची सोय आणि पोषक आहार यांसुद्धा राहणीमानात सुधारणा, सामाजिक स्थितिसुधार आणि मनोरंजनाच्या सुविधांची तरतूद,

(पाच) कामाच्या ठिकाणी ये-जा करण्यासाठी वाहनांची तरतूद ;

---

१. १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ आणि अनुसूचीद्वारे "भाग ख राज्ये खेरीजकरून" याऐवजी घातले.

२. १ एप्रिल, १९४७, पहा, अधिसूचना क्र. एलएमडब्ल्यू ५(४), दिनांक १७ एप्रिल, १९४७, गॅझेट ऑफ इंडिया, भाग एक, पृष्ठ ५४६.

३. १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ आणि अनुसूचीद्वारे "भाग क आणि भाग राज्ये" याऐवजी घातले.

यांस अनुलक्षून केलेल्या असतील त्यांचा खर्च ;

(ख्) ज्या बाबतीत निधीचा विनियोग करता येईल अशा कोणत्याही प्रयोजनासाठी केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या कोणत्याही योजनेप्रीत्यर्थ राज्य शासन, स्थानिक प्राधिकरण किंवा अभ्रक खाणीचा मालक, एजंट किंवा व्यवस्थापक यांना द्यावयाचे पैशांचे अनुदान ;

(ग्) कलम ४ खाली घटित केलेल्या सल्लागार समित्यांच्या सदस्यांचे भत्ते असल्यास ते आणि कलम ५ खाली नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांचे पगार व भत्ते असल्यास ते धरून निधीच्या प्रशासनाचा खर्च ;

(घ्) निधीमधून भागवायचा खर्च म्हणून केंद्र शासन निदेशित करील असा अन्य कोणताही खर्च, भागवण्यासाठी वापरता येईल.

(३) केंद्र शासनाला कोणताही विशिष्ट खर्च निधीच्या खर्चखाती टाकण्यायोग्य आहे किंवा नाही हे ठरवण्याची शक्ती असेल आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

(४) केंद्र शासन दरवर्षी, निधीमधून वित्तव्यवस्था करण्यात आलेल्या कार्यांचा अहवाल व सोबत निधीतील जमा आणि खर्च यांचे अंदाजपत्र आणि हिशेबाचे विवरणपत्र **शासकीय राजपत्रात** प्रकाशित करील.

सल्लागार समित्या.

४. (१) या अधिनियमाच्या किंवा निधीच्या प्रशासनातून उद्भवणाऱ्या कोणत्याही बाबी-संबंधी केंद्र शासनाला सल्ला देण्यासाठी केंद्र शासन [1][त्याला योग्य वाटतील तितक्या पण प्रत्येक राज्या-साठी एकापेक्षा अधिक नाहीत इतक्या सल्लागार समित्या] घटित करील.

(२) सल्लागार समित्यांच्या सदस्यांची नियुक्ती केंद्र शासन करील आणि या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित करण्यात येईल तितकी त्यांची संख्या असेल व तशा रीतीने ते निवडले जातील :

परंतु, प्रत्येक समितीमध्ये, अभ्रक खाण मालकांचे आणि अभ्रक खाणकाम उद्योगामध्ये कामाला असलेल्या कामगारांचे प्रतिनिधित्व करणारे जे सदस्य समाविष्ट असतील त्यांची संख्या समसमान असेल आणि प्रत्येक समितीत निदान एक तरी स्त्री-सदस्य असेल आणि प्रत्येक समितीचा निदान एक तरी सदस्य संबंधित राज्याच्या विधानमंडळाचा सदस्य असेल.

(३) प्रत्येक सल्लागार समितीच्या अध्यक्षाची नियुक्ती केंद्र शासन करील.

(४) केंद्र शासन सल्लागार समित्यांच्या सर्व सदस्यांची नावे **शासकीय राजपत्रातून** प्रकाशित करील.

अधिकाऱ्यांची नियुक्ती आणि त्यांच्या शक्ती.

५. (१) केंद्र शासनास, निधीचे प्रशासन करण्याकरिता किंवा निधीमधून वित्तव्यवस्था होत असलेल्या कार्यांवर देखरेख करण्याकरिता किंवा ती पार पाडण्याकरिता निरीक्षक, कल्याण प्रशासक आणि स्वतःला आवश्यक वाटतील असे अन्य अधिकारी नियुक्त करता येतील.

(२) याप्रमाणे नियुक्त करण्यात आलेला प्रत्येक अधिकारी हा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५)-कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

(३) कोणत्याही निरीक्षकाला किंवा कल्याण प्रशासकाला—

(क्) निधीमधून वित्तव्यवस्था होत असलेल्या कार्यांवर देखरेख करण्याच्या किंवा ती पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी जेथे प्रवेश करणे त्याला आवश्यक वाटेल अशा कोणत्याही जागी कोणत्याही योग्य वेळी त्याला योग्य वाटेल अशा सहाय्यानिशी प्रवेश करता येईल, आणि

(ख्) अशा जागेमध्ये आपली कर्तव्ये योग्यरीत्या पार पाडण्यासाठी आवश्यक असे काहीही करता येईल.

नियम करण्याची शक्ती.

६. (१) केंद्र शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाची प्रयोजने अंमलात आणण्यासाठी नियम[2] करता येतील.

(२) पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांद्वारे पुढील गोष्टींबाबत उपबंध करता येईल—

---

१. १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ आणि अनुसूचीद्वारे "एक मद्रास राज्याकरिता आणि एक बिहार राज्याकरिता, याप्रमाणे दोन सल्लागार समित्या" याऐवजी घातले.

२. अशा नियमांसाठी पहा, गॅझेट ऑफ इंडिया, १९४८, भाग एक, पृष्ठ ५८.

(क्) कलम २-पोटकलम (१) खाली बसवलेल्या सीमाशुल्काचे परतावे, माफी आणि वसुली;

(ख्) कलम ४ खाली घटित करण्यात आलेल्या सल्लागार समित्यांची रचना, त्यांचे सदस्य ज्या रीतीने निवडले जातील ती रीत, अशा सदस्यांचा पदावधी, त्यांना प्रदेय असलेले काही भत्ते असल्यास ते आणि सल्लागार समित्या ज्या रीतीने आपले कामकाज चालवतील ती रीत ;

(ग्) कलम ३-पोटकलम (२)-खंड (ख्) खाली निधीमधून द्यावयाचे पैशाचे अनुदान नियंत्रित करणाऱ्या अटी ;

(घ्) कलम ३-पोटकलम (४) मध्ये निर्देशिलेले अंदाजपत्र व विवरणपत्र यांचा नमुना ;

(ङ्) कलम ५ खाली नियुक्त केलेल्या सर्व अधिकाऱ्यांच्या सेवा-शर्ती आणि कर्तव्ये ;

(च्) अभ्रक खाणींचे मालक किंवा एजंट किंवा व्यवस्थापक यांनी आकडेवारीच्या रूपातील किंवा अन्य माहिती पुरवणे आणि या खंडाखाली केलेल्या नियमांच्या आवश्यकतांचे अनुपालन करण्यास चुकण्याबद्दल द्रव्यदंड.

## THE MICA MINES LABOUR WELFARE FUND ACT, 1946

### अभ्रक खाणी कामगार कल्याण निधि अधिनियम, १९४६

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| activities | कार्ये | [Preamble] |
| administer fund | निधीचे प्रशासन करणे | [S. 5(1)] |
| Advisory Committee | सल्लागार समिति | [S. 4-m.n.] |
| agent | एजंट | [S. 3(2)(b)] |
| amelioration | स्थितिसुधार | [S. 3(2)(a)(iv)] |
| carry out the activities | कार्ये पार पाडणे | [S. 5(1)] |
| cess | उपकर | [S. 2-m.n.] |
| collect | उगराणी करणे | [S. 2(1)] |
| collection and recovery | उगराणी आणि वसुली | [S. 2(2)] |
| conduct business | कामकाज चालवणे | [S. 6(2)(b)] |
| estimate | अंदाजपत्र | [S. 3(4)] |
| grant of money | पैशाचे अनुदान | [S. 6(2)(a)] |
| Inspector | निरीक्षक | [S. 5(1)] |
| Labour Welfare Fund | कामगार कल्याण निधि | [S. 3-m.n.] |
| levy | बसवणे | [S. 2(1)] |
| medical facilities | वैद्यकीय सुविधा | [S. 3(2)(a)(i)] |
| promote the welfare | कल्याणप्रवर्धन करणे. | [Preamble] |
| provision and improvement | तरतूद व सुधारणा | [S. 3(2)(a)(i)] |
| public health and sanitation | सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छता | [S. 3(2)(a)(i)] |
| receipts and expenditure | जमा आणि खर्च | [S. 3(4)] |
| recreational facilities | मनोरंजनाच्या सुविधा | [S. 3(2)(a)(iv)] |
| refund | परतावा | [S. 6(2)(a)] |
| remission | माफी | [S. 6(2)(a)] |
| report | अहवाल | [S. 3(4)] |
| statement of accounts | हिशेबाचे विवरणपत्र | [S. 3(4)] |
| water supplies | पाण्याचे साठे | [S. 3(2)(a)(ii)] |
| Welfare Administrator | कल्याण प्रशासक | [S. 5(1)] |

अभ्रक खाणी कामगार कल्याण निधि अधिनियम, १९४६

# THE MICA MINES LABOUR WELFARE FUND ACT, 1946

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्र | estimate | [S. 3(4)] |
| अहवाल | report | [S. 3(4)] |
| उगराणी आणि वसुली | collection and recovery | [S. 2(2)] |
| उगराणी करणे | collect | [S. 2(1)] |
| उपकर | cess | [S. 2-m.n.] |
| एजंट | agent | [S. 3(2)(b)] |
| कल्याणप्रवर्धन करणे | promote the welfare | [Preamble] |
| कल्याण प्रशासक | Welfare Administrator | [S. 5(1)] |
| कामकाज चालवणे | conduct business | [S. 6(2)(b)] |
| कामगार कल्याण निधि | Labour Welfare Fund | [S. 3-m.n.] |
| कार्ये | activities | [Preamble] |
| कार्ये पार पाडणे | carry out the activities | [S. 5(1)] |
| जमा आणि खर्च | receipts and expenditure | [S. 3(4)] |
| तरतूद व सुधारणा | provision and improvement | [S. 3(2)(a)(i)] |
| निधीचे प्रशासन करणे | administer fund | [S. 5(1)] |
| निरीक्षक | Inspector | [S. 5(1)] |
| परतावा | refund | [S. 6(2)(a)] |
| पाण्याचे साठे | water supplies | [S. 3(2)(a)(ii)] |
| पैशाचे अनुदान | grant of money | [S. 6(2)(a)] |
| बसवणे | levy | [S. 2(1)] |
| मनोरंजनाच्या सुविधा | recreational facilities | [S. 3(2)(a)(iv)] |
| माफी | remission | [S. 6(2)(a)] |
| वैद्यकीय सुविधा | medical facilities | [S. 3(2)(a)(i)] |
| सल्लागार समिति | Advisory Committee | [S. 4-m.n.] |
| सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छता | public health and sanitation | [S. 3(2)(a)(i)] |
| स्थितिसुधार | amelioration | [S. 3(2)(a)(iv)] |
| हिशेबाचे विवरणपत्र | statement of accounts | [S. 3(4)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई